19 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीएसटीमुळे देशाची बाजारपेठ विस्तारणार

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांचे मत : 'जी.एस.टी. व आपण' या विषयावर खुल्या आयोजनाचे चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशात असलेले कर हे ब्रिटिशकालीन होते. केंद्राच्या व राज्याच्या विविध करांची आकारणी करण्यात येत होती; पण आता वस्तू व सेवा करामुळे (जीएसटी) देशात एक देश, एक कर व एक बाजारपेठ निर्माण झाल्याने, देशाची बाजारपेठ विस्तारीत होणार आहे. या बदलाचे स्वागत सर्वांनी करावे, असे आवाहन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज व कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, शाहू स्मारक येथे, 'जी.एस.टी. व आपण" या विषयावर आयोजित खुल्या चर्चासत्रामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. चर्चासत्रांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, केंद्रीय जीएसटी विभागाचे साहाय्यक आयुक्त अश्विनकुमार हुके, उद्योजक सुरेंद्र जैन, चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, इन्व्हेस्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष मनीष झंवर व डॉ. विजय ककडे उपस्थित होते.



कोल्हापूर : शाहू स्मारक येथे आयोजित जीएसटी चर्चासत्रात बोलताना, अश्विनकुमार हुके. डावीकडून मनीष झंवर, सुरेंद्र जैन, डॉ. विलास नांदवडेकर, ललित गांधी, डॉ. जे. एफ. पाटील आदी.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले की, देशात केंद्राचे व राज्याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा १७ करांचा समावेश होता. केंद्राचे आठ तर राज्याचे नऊ विविध कर लागू होते. विविध करामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला होता. या विविध करांची गर्दी कमी करण्यासाठी, देशात जीएसटी लागू करण्यात आले. यामुळे वेळेची बचत, श्रम व अकौंटमुळे देशातील एकच बाजारपेठ निर्माण होऊन बाजारपेठ विस्तारीत होणार आहे.

जीएसटीमध्ये अप्रत्यक्ष करप्रणालीचा समावेश असल्याने, याचा बोजा शेवटच्या उपभोक्त्यावर पडणार आहे. सरकार चालवण्यासाठी प्रत्येक करदात्यांनी कर भरणे अनिवार्य आहे. जीएसटीमुळे देशात उत्पादकता रोजगार वाढीस लागणार आहे. हा देशातील सर्वात मोठा बदल आहे. आज खेड्यातील डेअरीमध्येसुद्धा संगणकीय प्रणाली असल्याने, ग्रामीण भागातील लोकांनी जीएसटीचा बाऊ करू नये. जीएसटीची आकारणी पाच वर्गांमध्ये करण्यात आली आहे; पण देशात आर्थिक अडचण निर्माण झाल्यास, जीएसटीचा कर ४० टक्क्यांवर नेण्याचा अधिकार १२२ व्या घटनेमुळे दिला असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. देशाच्या विषमतेमुळे इतर देशांसारख्या करप्रणाली अवलंबता आली नसल्याचेही त्यांनी सांगितले.

अश्विनकुमार हुके यांनी, जीएसटी व आयकर या कराचा कांहीच संबंध नसल्याचे स्पष्ट करून, जीएसटी हा अप्रत्यक्ष कर आहे. तर आयकर हा प्रत्येक आयकर दात्यांना भरणे बंधनकारक आहे. जीएसटी लागू करण्यासाठी सरकारला मोठी तारेवरची कसरत करावी लागली होती. जास्तीत जास्त २८ टक्के इतका जीएसटी लागू झाल्याने, वस्तूंचे दर पूर्वीपेक्षा कमी होणार आहेत. ही प्रणाली अवलंबण्यासाठी काही काळ लागणार आहे. नवीन दरामध्ये काही फेरफार वा चुकीचे स्टीकर लावल्यास तत्काळ आपल्याकडे तक्रार करण्याचे आवाहन केले. हुके यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे मुक्तपणे दिली. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे चिनी वस्तूवर सरकारला निर्बंध आणता येत नाहीत. नागरिकच यावर निर्बंध आणू शकतील, असे सांगितले.

19 JUL 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. मोरे यांचे निर्णय सर्व घटकांच्या हिताचे

## प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे प्रतिपादन : रवळनाथ सोसायटीच्या शाखेचा वर्धापनदिन

प्रतिनिधी
वाकरे

प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या बी. सी. यू. डी. संचालकपदाच्या माध्यमातून संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी या सर्व घटकांना हिताचे निर्णय घेतले. त्यांनी तसेच प्रा. डॉ. वासंती रासम यांनी शिक्षणक्षेत्रातील येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील आपले काम यापुढेही चालू ठेवावे, असे आवाहन ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी केले.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखेचा पाचवा वर्धापनदिन स्नेहमेळावा व गौरव समारंभात ते बोलत होते.



कोल्हापूर : प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील. सोबत एम. एल. चौगुले, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. वासंती रासम, प्रा. आर. एस. पाटील.

अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्राचार्य डॉ. मोरे यांनी सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करून शिक्षक कधीही सेवानिवृत्त होत नसल्याचे सांगितले. गेल्या ३९ वर्षांत विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कार्य केले असून, प्रशासनात संयम महत्वाचा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी प्राचार्य डॉ. मोरे यांचा प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते तर डॉ. रासम यांचा सत्कार प्रकुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. वासंती रासम, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची भाषणे झाली.

कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, प्रा. आर. एस. पाटील प्राचार्य सी. आर. गोडसे, डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. सतिश घाळी, प्राचार्य डॉ. नागेश नलवडे, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, डॉ. पाटील, प्राचार्य डॉ. डी. डी. कुरळपकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2017
लोकमत

# विद्यापीठात शुक्रवारी खेळाडूंचा गुणगौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सन २०१५-१६ मध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या खेळाडूंचा शिवाजी विद्यापीठातील क्रीडा अधिविभागातर्फे शुक्रवारी (दि. २१) सकाळी दहा वाजता गुणगौरव केला जाणार आहे. विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय जलतरणपटू वीरधवल खाडे प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहे.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील शारीरिक शिक्षण संचालकांसाठी 'शारीरिक शिक्षण' या विषयावर दुपारी एक ते सायंकाळी पाच वाजता कार्यशाळा होणार आहे. यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, 'इलाईट'चे संस्थापक संचालक डॉ. रोहन चव्हाण हे मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2019

सकाळ



## सेवकांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर

कोल्हापूर, ता. १८ : वैद्यकीय तपासणीकडे पाठ फिरविणाऱ्या शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांसाठी गुरुवारी (ता. २०) व शुक्रवारी (ता. २१) पुन्हा वैद्यकीय तपासणी शिबिर होत आहे. विद्यापीठातर्फे १४ जून ते ११ जुलै दरम्यान शिबिराचे आयोजन केले आहे. काही प्राध्यापक, अधिकारी व सेवक यांनी तपासणी करून घेतली नाही. त्यामुळे विद्यापीठाने पुन्हा शिबिराचे आयोजन केले आहे.

# कौशल्याधारित कम्युनिकेशन

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य विकसित करून, त्यांना रोजगाराभिमुख करण्याचे प्रयत्न सध्याच्यां प्रचलित पद्धतीमध्ये अग्रक्रमाने सुरू आहे.



पत्रकारिता हा विषय सुरूवातीपासून रोजगार निर्मितीसाठी उपयुक्त आहे. भारतात १९२० साली डॉ. अॅनी बेंझट यांनी पत्रकारितेच्या शिक्षणाला मद्रासजवळ ओडियार येथे सुरूवात केली. येत्या तीन वर्षात भारतीय पत्रकारिता शिक्षणाला शंभर वर्षे पूर्ण होतील. पत्रकारिता या पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये गेल्या दशकात एम.ए.मास कम्युनिकेशन विषयाची भर पडली आहे. एम.ए. मास कम्युनिकेशन हा स्वतंत्र अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) तयार करून देशातील सर्वच विद्यापीठात पत्रकारितेचा हा सुधारित अभ्यासक्रम अंमलात आणला आहे.

शिवाजी विद्यापीठात, मास कम्युनिकेशन हा विषय, स्वतंत्र इमारतीत. २००५ पासून सुरू करण्यात आला. दोन वर्षांच्या या अभ्यासक्रमांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या इतर प्रवेश परीक्षांसोबत शंभर गुणांची ऑफलाइन प्रवेश परीक्षा घेण्यात येते. अभ्यासक्रमासाठी कोणत्याही विषयातील पदवी घेतलेला विद्यार्थी हा पात्र असतो. हा अभ्यासक्रम पूर्णतः व्यावसायिक असल्याने त्याला वयाची अट नाही. त्यामुळे वर्गामध्ये अभियांत्रिकी, वैदयकीय, सायन्स, भाषा, सामाजिकशास्त्र, कायदा व इतर कोणत्याही विषयाचा विद्यार्थी एम.ए.मास कम्युनिकेशनसाठी प्रवेश घेताना दिसतो. शंभर गुणांच्या ऑफलाइन ; लेखी परिक्षेसाठी चालू घडामोडी, माध्यमातील महत्वपूर्ण घडामोडी यांसह अॅटीट्यूट, अॅप्टीट्यूड याविषयी वस्तुनिश्ठ प्रश्न विचारले जातात. प्रवेश परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० गुण आवश्यक असतात. स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांचा मास कम्युनिकेशन या विषयाकडे वळण्याचे प्रमाण वाढत असल्याने, तसेच एम.ए किंवा पुढील उच्च शिक्षण घेतलेले विद्यार्थी, विविध व्यावसायिक, पत्रकार येथे वळत असल्याने, येथे किमान गुण मिळवून उत्तीर्ण होण्यापेक्षा अधिक स्पर्धा करणे आवश्यक आहे. मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमात सर्व माध्यमांची जशी तोंडओळख करून दिली जाते, तसेच इंटरनॅशनल कम्युनिकेशन, कम्युनिकेशन रिसर्च, आयसीटी, इंटरकल्चरल कम्युनिकेशन याषिवाय डॉक्युमेंटरी आणि पर्यावरण पत्रकारिता यासारखे विषय षिकवले जातात. हा अभ्यासक्रम पन्नास टक्के प्रात्यक्षिकांवर आधारित असल्याने विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके अपरिहार्य ठरतात. विद्यार्थी इथेच आपले करिअर निश्चित करू शकतो. आपल्या पुढील करिअरच्या स्पेशलायझेशनची सुरूवात या प्रात्यक्षिकांमधूनच होतांना दिसते. थिअरीच्या अठरा विषयांसोबत अभ्यासहल, स्वतंत्र कॅम्पस न्यूजपेपर, सेमिनार्स, माध्यमांना भेट, माध्यम प्रषिक्षण असे महत्वाचे उपक्रम वर्षभर घेतले जातात. सखोल संशोधन हे डेझर्टेशनसाठी आवष्यक ठरते.

हे सर्व सांगण्याचा उद्देश एवढाच की, मास कम्युनिकेशन हा विषय पत्रकारितेपेक्षा वेगळा कसा ? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. जगभरात माध्यमांची होणारी वाढ पहाता आणि या सर्व माध्यमांची अंतिम हेतू हा अगणित असंख्य हे जनसमुदायापर्यंत संवाद साधणे हा असल्याने आणि जग हे ख-या अर्थाने खेडे झालेले असल्याने मास कम्युनिकेषन या संकल्पनेला महत्व प्राप्त झालेले आहे. नवमाध्यमे आणि माध्यम तंत्रज्ञानाचाही प्रामुख्याने यामध्ये विचार होतो. सोशल मीडिया, न्यू मीडिया यांचाही अभ्यास भविष्यात होणे अपेक्षित आहे. या माध्यमांची पोहोच, प्रभाव, आचारसंहिता यांचाही अभ्यासक्रमात समावेश होत आहे.

मास कम्युनिकेशन म्हणजे जनसंवाद. यासाठी जे माध्यम लोक अधिक वापरतात, त्या माध्यमांचा अवलंब करणे आवश्यक ठरत असल्याने ई-प्रशासन, मोबाइल प्रशासन अशा संकल्पना रूजल्या आहेत. कार्पोरेट कंपन्यांच्या अंतर्गत संवाद तज्ज्ञ हा कार्पोरेट कम्युनिकेटर म्हणून ओळखला जातो. जागतिक बँकांपासून तर संयुक्त राष्ट्रसंघासारख्या जागतिक संघटनेपर्यंत दूतावास यामध्येही माध्यमांसाठी स्वतंत्र पदे किंवा विभाग असतात.

माध्यमांशिवाय आपण जगाची कल्पना करू षकत नाही. माध्यमांमुळे अनेक रोजगार उपलब्ध होतात. यात मध्ये व्हर्च्युअल असिस्टंटशीप, ऑनलाइन मार्केटिंग, वेब डिझायनिंग, व्हिडिओग्राफर, कंटेंट रायटर, ऑनलाइन ट्यूटोरिअल, ब्लॉगर, डॉक्युमेंटरी मेकर अशा अनेक संधी मिळू शकतात. मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासोबत कमी कालावधीचे ऑनलाइन कोर्स करणे आवश्यक आहे. तीन किंवा सहा महिन्यांचे पदव्युत्तर प्रमाणपत्र अभ्यासक्रम नजीकच्या काळात मास कम्युनिकेशन विभागात सुरू होणार आहेत. माध्यमांच्या कायद्याच्या जाणीव जागृतीसाठी जसा मीडिया लॉ आहे, तसाच सायबर लॉ आणि माध्यमे हे स्वतंत्र विषयही महत्त्वाचे ठरतात. थोडक्यात मास कम्युनिकेशन ही माध्यमांचे केवळ जग समजून घेण्याची संधी नव्हे तर अधिक कौशल्य आत्मसात करण्याची, स्वविकासाची संधी आहे. ती चांगला पत्रकार, माणूस घडविण्यासाठीही उपयुक्त ठरू शकते.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com

19 JUL 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समीक्षा, मूळ दस्ताऐवजांचे भांडार

Balasaheb.Patil
@timesgroup.com
Tweet : @balpatilMT



माझे ग्रंथालय

**कोल्हापूर :** वैयक्तिक ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, ललित संग्रह आणि अन्य साहित्य बऱ्याचदा असते. मात्र, या ग्रंथालयाची उंची वाढते ती मूळ दस्ताऐवज आणि दुर्मिळ ग्रंथांमुळे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांच्या ग्रंथालयातही आपल्याला अनेक मूळ दस्ताऐवज आणि दुर्मिळ ग्रंथ पहायला मिळतात.

मराठीतील आघाडीचे समीक्षक आणि लेखक डॉ. रणधीर शिंदे यांच्या अंबाई डिफेन्स कॉलनी परिसरातील प्रथमेश अपार्टमेंटमधील फ्लॅटमध्ये अनेक दुर्मिळ पुस्तकांचा खजिनाच पहायला मिळतो. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या साहित्य आणि चळवळीचा मागोवा घेत त्यांनी डॉ. गो. मा. पवार यांच्यासोबत दोन खंडांचे संपादन केले आहे. त्यामुळे वि. रा. शिंदे यांचे बरेचसे साहित्य त्यांच्याकडे पहायला मिळते. या ग्रंथालयाचा आत्मा म्हणजे वि. रा. शिंदे यांच्या जवळपास २५ रोजनिशी. त्यांच्याकडे समिक्षात्मक ग्रंथ आणि कवितांचा मोठा संग्रह त्यांच्याकडे आहेत. चित्रे, वसंत आबाजी डहाके, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर, इंद्रजित भालेराव, दिलीप कुलकर्णींचा 'अरण्यरुदन आणि पालखीची गाणी' आदी संग्रहांबरोबर नवकवितांचा मोठा खजिना पहायला मिळतो.

भालचंद्र नेमाडे, डॉ. गो. मा. पवार, चि. वि. जोशी, डॉ. राजन गवस, शरदचंद्र मुक्तीबोध, सतीश काळसेकर, चारुता सागर, सुनीलकुमार लवटे, लक्ष्मीकांत देशमुख आदींच्या ग्रंथांनी कप्पे भरले आहेत. त्याचबरोबर भाऊ पाध्ये, रंगनाथ पठारे, व्यकटेश माडगूळकर, शंकर पाटील, बाबूराव बागूल, अर्जुन डांगळे, द. मा. मिरासदार, रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, विवेक राजापुरे, कमल देसाई, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंडुलकर यांच्याबरोबरच जयंत पवार, आसाराम लोमटे, कृष्णात खोत, आनंद विंगकर, किरण गुरव आदी नव्या लेखकांचा संग्रह त्यांच्याकडे आहे.

ललितेतर निसर्ग व इतर संग्रहात मृगपक्षिणास्त्र(नरसिंहशास्त्र भातखंडे), पंडिता सातवळेकर (मु. पो. गोखले), रावसाहेब मंडलिक यांचे चरित्र (गणेश हवालदार), न. चि. केळकर यांच्या आठवणी (स. वि. बापट, १९४८), आधुनिक कविपंचक (ग. त्र्य माडखोलकर, १९२१), छन्दोरचना (माधवराव पटवर्धन, १९३७), रवींद्रनाथ जीवनकथा (गं. दे. खानोलकर), सोव्हिएत रशियाची पन्नास वर्षे (प्रबोधन पत्रिका द्विखंडात्मक बृहत अंक), महाराष्ट्र जीवन परंपरा प्रगती आणि समस्या (संपादक : ग. बा. सरदार), मराठी नाटकाची गंगोत्री (सरोजिनी शेंडे), सुमित्रानंद पंत (दि. के. बेडेकर, १९४८),आहारशास्त्र (दामोदर सांडू, १९३४), महाराष्ट्र व म. गांधी, दा. न. शिखरे, कलाविमर्श (बालकृष्ण दाभाडे) आदी दुर्मिळ ग्रंथ पहायला मिळतात.

> **डॉ. गो. मा. पवार आणि दि.पु.चित्रे यांच्या पत्नी विजया यांनी मला बराच ग्रंथसंग्रह दिला आहे. पवार यांच्याकडील महर्षी शिंदे यांचे अप्रकाशित साहित्य तर दि. पु. चित्रे यांच्या ग्रंथालयातील जवळपास २०० हून अधिक हिंदी, इंग्रजी कवितासंग्रह माझ्याकडे आहेत.**
>
> **- डॉ. रणधीर शिंदे, समीक्षक**

त्याचबरोबर भालचंद्र नेमाडे यांची 'टीकास्वयंवर' वसंत आबाजी डहाके यांचे 'कवितेविषयी', सुधीर रसाळ यांचे 'मर्ढेकरांची कविता', डॉ. गो. मा. पवार यांची 'साहित्यमूल्य आणि अभिरुची', रवींद्र किंबहुणे यांचे 'किंबहुणा', भगवान काळे यांचे 'इंद्रजित भालेराव यांची कविता: आकलन, आस्वाद आणि आक्षेप' असे अनेक कवितेविषयीचे समिक्षात्मक ग्रंथ त्यांच्या संग्रही आहेत.

वैचारिक संग्रहांमध्ये कॉ. गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती, राम बापट यांचे 'राज्यसंस्था, भांडवलशाही आणि पर्यावरणवाद', भा. ल. भोळे यांचे 'विसाव्या शतकातील मराठी गद्य', यशवंत सुमंत यांचे 'महाराष्ट्रातील जातीसंस्थाविषयक विचार', मे. पु. रेगे यांची 'मर्मभेद, पाश्चात्य नीतीशास्त्राचा इतिहास', 'विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा' अशोक चौसाळकर यांचे 'नवरात्र', शरद पाटील यांचे 'दासशूद्रांची गुलामगिरी', दिगंबर पाध्ये यांचे 'अवलोकन : मराठी समीक्षा आणि साहित्य',त्याचबरोबर दि. के. बेडेकर, त्र्यं. श. शेजवलकर, गो. पु. देशपांडे, रावसाहेब कसबे आदींचे ग्रंथ त्यांच्याकडे आहेत.

त्याचबरोबर राजन गवस यांचे 'चांगदेव चतुष्ट्य', सदानंद मोरे यांचे 'लोकमान्य ते महात्मा', ह. वि. मोटे यांचे 'त्र्यं. श. शेजवलकर निवडक लेखसंग्रह' आदी महत्त्वाचे ग्रंथ त्यांच्याकडे आहे. त्याचबरोबर समाजविज्ञान कोश, स्त्री साहित्याचा कोश, स्थलकोश, अनुवादकोश, तंजावरी भाषेचा कोश, तमीळ मराठी, पाली मराठी, परमार्थिक कोश, समीक्षा कोश, होमिओपाथिक औषधांचा लक्षण भावना कोश आदी कोशही त्यांच्याकडे आहेत.

## महर्षी शिंदेंचे दुर्मिळ वाड्मय

समाजसुधारक महर्षी शिंदे यांचे दुर्मिळ आणि अप्रकाशित वाङमय त्यांच्याकडे आहे. ज्येष्ठ समीक्षक गो. मा. पवार यांच्याकडून त्यांना हा दूर्मिळ ठेवा मिळाला आहे. शिंदे यांची रोजनिशी, पत्रे, हस्तलिखिते महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा पट उलगडून दाखवितात. मोडी आणि मराठी भाषेतील पत्रे, लेखनशैली आणि अनेक अंगानी वैशिष्टपूर्ण आहेत.